दि. १४.०१.२०१७

## *दयानंद कला महाविद्यालयात रा.से.यो. वार्षिक शिबीर संपन्न*

लातूर - दयानंद कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय "पर्यावरण, जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत अभियान युवक शिबीर" मौजे महापूर, ता. जि. लातूर येथे संपन्न झाले. समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे दयानंद शिक्षण संस्थेचे संयुक्त सचिव मा. श्री. सुरेशजी जैन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरामधून विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होतो. ग्रामीण समस्येची जाणीव शिबीरार्थ्यांना होते. आपण ज्या समाजामध्ये राहतो त्या समाजाला आपन समजून घेतले पाहिजे असा संदेश त्यांनी दिला. प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी आपल्या मनोगतातून स्वयंसेवकांना नैतिक दृष्ट्या प्रेरित करुन आपल्या जीवनात येणाऱ्या अडचणी दूर करण्याचे बळ अशा शिबीरातून मिळते असे मत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, ग्रामसेवक मा. श्री. सूर्यवंशी, मा. श्री. माणिकराव आलूरे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वा.रा.ती.म.वि. च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सल्लागार डॉ. संतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. तसेच या कार्यक्रमात प्रा.डॉ. सुनीता सांगोले, प्रा.डॉ. अंजली जोशी, प्रा. संदीप जगदाळे, प्रा.डॉ. गोपाल बाहेती, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. सुधीर गाढवे हे उपस्थित होते.

शिबीराच्या यशस्वीते बद्दल मेंढेकर संदीप, पवार रोहित, कु. सूर्यवंशी शीतल, कु. स्वाती या स्वयंसेवकांनी व कैलास माने व संतोष ठाकूर यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. तसेच गावकऱ्यांनी चांगली प्रतिक्रिया दिली.

प्रा. डॉ. गणेश लहाणे यांनी आभार मानले सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले.

---